


वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™




पाच बळी गेले तरी मॅनहोल 'सुरक्षित' कसे?

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 28 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ईशा फाऊंडेशनच्या ७७ पर्यटकांसह 300 भारतीय बेपत्ता!

# नेपाळच्या महापुरात 277 मृत्युमुखी



**महाईन्यूज । नेपाळ**

**नेपाळमध्ये गेल्या दोन दिवसांपासून पुरामुळे आलेल्या महाप्रलयानं मानवी प्रयत्नांसमोर मोठं आव्हान उभं केलं आहे. हिमस्खलनामुळे ही पूरस्थिती निर्माण झाल्याचा प्राथमिक अंदाज वैज्ञानिकांनी वर्तवला आहे. मात्र, या पुरामुळे काही क्षणांत मोठ्या वेगानं आणि मोठ्या प्रमाणावर आलेल्या पाण्यामुळे गावंच्या गावं वाहून नेल्याची भयानक दृश्य सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होऊ लागली आहेत.**

काळजाचा थरकाप उडवणाऱ्या या दृश्यांमध्ये निसर्गाचा कोप आणि जगण्यासाठीची माणसाची धडपड अशा दोन्ही बाबी प्रकर्षानं जाणवत असल्याचं दिसून येत आहे. नेपाळमधील या पूरस्थितीत जवळपास ३०० भारतीय बेपत्ता असून त्यात ईशा फाऊंडेशनचे ७७ पर्यटक व ३ स्वयंसेवक अशा एकूण ८० जणांचा समावेश आहे. आत्तापर्यंत या पुरात २७७ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत आकडेवारी समोर आली आहे.

बुधवारी सकाळच्या सुमारास नेपाळच्या रसुवा जिल्ह्याला पुराचा मोठा फटका बसला. तिबेटच्या सीमेला लागूनच नेपाळमधील हा भाग असून तिबेटमध्ये झालेल्या हिमस्खलनामुळे ही भीषण पूरस्थिती निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे. यामुळे भोते कोशी आणि त्रिशुली नद्यांना मोठा पूर आला आहे. या पूरस्थितीमुळे नेपाळमध्ये आत्तापर्यंत जवळपास १५०० नागरीक बेपत्ता झाल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे.





### तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळमध्येही नागरिक अडकले

कुंभकोणममधून गेलेल्या ५७ तामिळ भाविकांपैकी २० जण सुरक्षित असल्याची माहिती मिळाली असून, उर्वरितांचा शोध सुरू आहे. आंध्र प्रदेशातील सात पर्यटकांपैकी चार जण सुरक्षित सापडले असून, तीन जण बेपत्ता आहेत. केरळमधील सुमारे ५३ नागरिक विविध भागांत अडकले असले तरी ते सुरक्षित असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.







### ऑस्ट्रेलियातून आलेले दाम्पत्य बेपत्ता

ओडिशातील संदीप महापात्रा आणि त्यांची पत्नी सिद्धार्थ कुमारी साहू हे मागील आठ वर्षांपासून ऑस्ट्रेलियात स्थायिक आहेत. दोघे २२ ऑगस्ट रोजी सुट्टीसाठी नेपाळला आले होते. ढगफुटीच्या वेळी त्यांचे शेवटचे लोकेशन इमिग्रेशन केंद्राजवळ आढळले. त्यानंतर दोघांचेही फोन बंद असल्याने नातेवाईक चिंतेत आहेत.

### महाराष्ट्रातील ८० हून अधिक पर्यटक अडकले

महाराष्ट्रातील ८० हून अधिक पर्यटक व भाविक नेपाळमध्ये अडकले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आतापर्यंत चौघांशी संपर्क झाला आहे. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील पर्यटक दोन बसमधून नेपाळला गेले असून, ४५ जणांचे दोन गट आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्र सरकारच्या संपर्कात असून, नेपाळ प्रशासनाशी समन्वय साधला जात आहे.

# नेपाळमधील पुरात पुण्यातील ४ जण अडकले

## सीमेवरील कार्यालयच वाहून गेल्याने परतीचा मार्ग खुंटला!

**महाईन्यूज । पुणे**

**बुधवारी सकाळी नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे पुण्यातील ४ पर्यटक अडकल्याची माहिती समोर आली आहे. कैलास मानसरोवर यात्रेसाठी हे चौघेजण पुण्यातून गेले होते. मात्र, यात्रा पूर्ण करून माघारी येत असताना पुराच्या पाण्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला. तिबेटमधील जिलाँग शहरात हे चौघे अडकून पडले असून चौघेही सुखरूप असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. नेपाळच्या रसुवा आणि नुवाकोट जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे नेपाळ सीमेवरील आख्खं इमिग्रेशन कार्यालयच वाहून गेलं. त्यामुळे या यात्रेकरूंना परतीसाठी रस्तेमार्गाने येण्याचा कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही, अशीही माहिती पुणे जिल्हा माहिती कार्यालयाने दिली आहे.**



जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, स्मिता पवार योगिनी पाटील, दिनेश भोसले व पूजा भोसले अशी पुण्यातील या यात्रेकरूंची नावं आहेत. हा गट पुण्याहून कैलास मानसरोवर यात्रेसाठी निघाला होता. नेपाळमधून ही यात्रा पूर्ण करून हे चौघे परतीच्या वाटेवर होते. मात्र, नेपाळ सीमेवरचं कार्यालयच वाहून गेल्यामुळे आता सीमा पार करून माघारी कसं यायचं? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले यात्रेकरू किंवा इतर कोणत्याही पर्यटकांना नेपाळ सीमेवरील इमिग्रेशन कार्यालयातूनच देशात वा देशाबाहेर प्रवास करता येणं शक्य आहे. मात्र, नपाळमधील पुरामध्ये हे आख्खं कार्यालयच वाहून गेल्यामुळे रस्तेमार्गाने परतीचा मार्ग खुंटला आहे. शिवाय, जिलाँग किंवा आसपासच्या परिसरातदेखील परिस्थिती सुरक्षित नसल्यामुळे पुण्यातील या चौघांनी जिलाँगमधून काठमांडूमध्ये एअरलिफ्ट केलं जावं, अशी विनंती केली आहे. काठमांडूमध्ये अतिरिक्त वैद्यकीय उपचार मिळणं शक्य होईल, असंही त्यांचं म्हणणं असल्याचं जिल्हा माहिती कार्यालयाकडून सांगण्यात आलं आहे.

नेपाळ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आत्तापर्यंत १५०० हून अधिक नागरिक बेपत्ता झाले असून २०० जणांचा मृत्यू झाला आहे. एकूण १३० भारतीय नेपाळच्या पुरात बेपत्ता झाल्याची अधिकृत आकडेवारी नेपाळ प्रशासनाने जारी केली आहे.

### यात्रेदरम्यान दोघींची प्रकृती बिघडली

दरम्यान, पुण्यातील या चौघांपैकी स्मिता पवार व योगिनी पाटील या दोघींना मानसरोवर येथे अती उंचावरच्या प्रवासामुळे ऑक्सिजनची कमतरता जाणवू लागली. त्यामुळे त्यांना तातडीने खाली जिलाँग शहरात परत आणण्यात आलं आणि ऑक्सिजन देण्यात आला. इंडियन एक्स्प्रेसनं सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, त्या दोघींना अधिकचे वैद्यकीय उपचार देण्याची गरज असून हे उपचार जिलाँग येथील रुग्णालयात उपलब्ध नाहीत.

# चाकणनंतर हिंजवडी आयटी पार्कमधील उद्योग बाहेर जाण्याची भीती!

**महाईन्यूज । पुणे**

**चाकण औद्योगिक क्षेत्रानंतर आता हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कसह परिसरातील पायाभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या परिसरात काम करणाऱ्या लाखो आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिकांना दररोज यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा निर्णय आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनी घेतला आहे. या आंदोलनात आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उडी घेतली असून येथील उद्योग बाहेर जातील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**



सुप्रिया सुळे यांनी आयटी पार्कमधील आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यांनी 'एक्स' समाजमाध्यमावर याबाबत पोस्ट केली असून, त्यात म्हटले आहे की, जागतिक स्तरावर पुण्याची ओळख 'आयटी हब' म्हणून निर्माण करणाऱ्या हिंजवडी येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्क आणि परिसराची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांची बिकट अवस्था, दररोजची प्रचंड वाहतूक कोंडी, सुरक्षेचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. स्थानिक रहिवाशांना मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. येथील दुरवस्थेबाबत मी स्वतः शासन आणि संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. गेल्या २ वर्षांत खड्डे आणि अपघातांमुळे २० पेक्षा जास्त नागरिकांचा बळी गेला आहे, तरीही राज्य सरकारला जाग येत नाही ही अतिशय खेदाची बाब आहे.

गेल्या वर्षी मुख्यमंत्र्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि विविध आस्थापनांची बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत 'सिंगल पॉईंट अथॉरिटी' नेमण्याची घोषणा झाली. परंतु, वर्षभरानंतरही या अथॉरिटीच्या माध्यमातून एकही मुख्य प्रश्न सुटलेला नाही. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महापालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) यांच्यात समन्वय नसल्याने कामे रखडली आहेत. परिणामी येथील उद्योग इतरत्र जाण्याची भीती निर्माण झाली आहे. मोठ्या परिश्रमाने आणि दूरदृष्टीने उभारलेला येथील आयटी उद्योग केवळ पायाभूत सुविधांच्या दुर्दशेमुळे इतरत्र जाण्याच्या मानसिकतेमध्ये असेल तर राज्य सरकार हिंजवडीच्या समस्यांबाबत अजिबात गंभीर नाही असेच म्हणावे लागेल, असे सुळे यांनी म्हटले आहे.

केवळ घोषणा करायच्या आणि बैठकांचे सोपस्कार पाडायचे, या पलीकडे प्रत्यक्ष काहीही काम झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच मी नागरिकांनी पुकारलेल्या आंदोलनात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. कारण स्थानिक नागरिक, गृहिणी आणि तरुण अभियंते जेव्हा आपल्या हक्कांसाठी आंदोलनाची हाक देतात, तेव्हा ते या व्यवस्थेच्या अपयशाचे लक्षण आहे. माझी शासनाला विनंती आहे की, कृपया चाकण पाठोपाठ पुण्याच्या परिसरातील दुसऱ्या मोठ्या औद्योगिक वसाहतीचे अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्या आणि ते प्राधान्याने सोडवा, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

# पाच बळी गेले तरी मॅनहोल ‘सुरक्षित’ कसे?

## एकाच चेंबरमध्ये वर्षभरात पाच बळी; कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**निगडी प्राधिकरण परिसरात लोकमान्य हॉस्पिटलजवळ बुधवारी (२६ ऑगस्ट) रात्री मॅनहोलच्या चेंबरमध्ये साफसफाईचे काम करत असताना दोन कामगार अडकून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांची नावे अमोल शिंदे (२०) आणि मनोज शिंदे (२६) अशी आहेत.**



मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही कामगार चेंबरमध्ये काम करण्यासाठी उतरले होते. रात्री सुमारे मध्यरात्रीच्या सुमारास ते चेंबरमध्ये अडकल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी बचावकार्य करून दोन्ही कामगारांना चेंबरमधून बाहेर काढले. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वैद्यकीय तपासणी आणि शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे विषारी वायू, ऑक्सिजनची कमतरता किंवा अन्य कारण याबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही.

या घटनेमुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे, याच मॅनहोलमध्ये सुमारे वर्षभरापूर्वी तीन बीएसएनएल कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. आता अमोल आणि मनोज यांच्या मृत्युमुळे याच मॅनहोलशी संबंधित दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये मृतांची संख्या पाचवर पोहोचली आहे.

वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे मॅनहोलमध्ये कामगारांना उतरवताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना केल्या जातात का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाचा पोलीस तपास सुरू असून, कामगारांना चेंबरमध्ये पाठवण्यापूर्वी कोणती सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती, याचीही चौकशी होण्याची शक्यता आहे.

### वर्षभरापूर्वी तिघांचा मृत्यू; आता पुन्हा दोघांचा बळी

निगडी प्राधिकरणातील लोकमान्य हॉस्पिटलजवळील याच मॅनहोलमध्ये सुमारे वर्षभरापूर्वी तीन बीएसएनएल कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. आता बुधवारी रात्री साफसफाईसाठी चेंबरमध्ये उतरलेल्या अमोल शिंदे (२०) आणि मनोज शिंदे (२६) यांचा मृत्यू झाला. त्यामुळे एकाच मॅनहोलशी संबंधित दोन घटनांमध्ये मृतांची संख्या पाचवर पोहोचली आहे. वारंवार जीवितहानी होऊनही कामगारांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना झाल्या का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

# माहेरच्या मालमत्तेसाठी छळ; वाकडमध्ये विवाहितेने जीवन संपवले!




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**माहेरच्या मालमत्तेत हिस्सा घेण्यासाठी तसेच मालमत्तेच्या कागदपत्रांवर भावांच्या बाजूने सह्या केल्याच्या कारणावरून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा प्रकार वाकडमध्ये समोर आला आहे. या छळाला कंटाळून शिल्पा सचिन गवारे (वय ४२) यांनी आत्महत्या केली. गुरुवारी (दि. २७) रात्री सुमारे एकच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.**

या प्रकरणी शिल्पा यांचे भाऊ संतोष गुलाब कलाटे (वय ४७, रा. दत्तमंदिर रोड, वाकड) यांनी वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पती सचिन उत्तम गवारे, सासरा उत्तम शिवराम गवारे, सासू संजीवनी उत्तम गवारे आणि दीर संदीप उत्तम गवारे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, शिल्पा यांचा विवाह २००९ मध्ये सचिन गवारे यांच्यासोबत झाला होता. पैशांसाठी त्यांचा छळ सुरू झाल्याचा आरोप आहे. पती दारूच्या नशेत मारहाण करीत होता, तर सासूकडून चारित्र्यावर संशय घेतला जात असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

वडिलांच्या मालमत्तेत हिस्सा घ्यावा तसेच माहेरच्या मालमत्तेच्या कागदपत्रांवर सासरच्यांना न सांगता सह्या करू नयेत, यासाठी दबाव आणला जात होता. काही दिवसांपूर्वी शिल्पा यांनी सासरच्यांना न सांगता कागदपत्रांवर भावांच्या बाजूने सह्या केल्याने त्यांचा अधिक छळ झाल्याचा आरोप आहे. बहिणीचा संसार टिकावा म्हणून आपण अनेकदा सासरच्यांची समजूत काढली.

या प्रकरणात हुंडाबळीचे कलम नसून, पैशांसाठी आणि माहेरच्या मालमत्तेतील हिस्स्यासाठी छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. तपास सुरू आहे. फिर्यादीत सचिनविरोधातील विवाहापूर्वीच्या खुनाच्या गुन्ह्याची माहिती लपविल्याचाही आरोप असून, त्याला या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झाली होती, असेही नमूद आहे.

### मृत्यूबाबत नातेवाईकांचा संशय

रात्री शिल्पा आणि त्यांच्या पतीमध्ये भांडण झाल्याचे दिराने माहेरच्या व्यक्तींना कळविले. नातेवाईक रुग्णालयात पोहोचले असता डॉक्टरांनी शिल्पा यांना मृत घोषित केले. बेडरूमचा दरवाजा उघडा ठेवून छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतल्याचे सासरच्यांनी सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मात्र, नातेवाईकांनी संशय व्यक्त करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

### मालमत्तेसाठी छळाचा आरोप

माहेरच्या मालमत्तेतील हिस्स्यासाठी शिल्पा गवारे यांच्यावर दबाव आणल्याचा आरोप आहे. मालमत्तेच्या कागदपत्रांवर भावांच्या बाजूने सह्या केल्याने त्यांचा छळ वाढल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पतीकडून मारहाण आणि सासूकडून चारित्र्यावर संशय घेतल्याचाही आरोप आहे. आत्महत्येच्या घटनेनंतर नातेवाईकांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त केला असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.






## भूमिका

**शाळा-महाविद्यालये ही केवळ माहिती देणारी केंद्रे नसून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, तर्क करायला आणि विविध मतांचा विचार करायला शिकवणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे राज्यशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणाऱ्या समित्यांच्या रचनेवरून निर्माण होणारे प्रश्न हे शिक्षणाच्या तटस्थतेशी आणि विद्यार्थ्यांच्या वैचारिक स्वातंत्र्याशी संबंधित आहेत.**

# वेदांताचा गौरव, विज्ञानाचा विसर नको!



भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास शिक्षणात असायलाच हवा. आर्यभट्ट, बौधायन, पाणिनी, चरक, सुश्रुत, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त आणि भास्कराचार्य यांचे योगदान जगाला माहीत आहे. गणित, खगोलशास्त्र, वैद्यक, भाषा आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रांत भारताने दिलेले योगदान विद्यार्थ्यांना समजणे आवश्यक आहे. मात्र प्राचीन ज्ञानाचा गौरव करताना प्रत्येक प्राचीन संकल्पनेला आधुनिक विज्ञानाचे प्रमाणपत्र देणे योग्य ठरणार नाही.

वेदांतातील आत्मा, ब्रह्म, चेतना किंवा विश्वविषयक विचारांचा तत्त्वज्ञान म्हणून अभ्यास होऊ शकतो; परंतु त्यांची आधुनिक भौतिकशास्त्राशी थेट तुलना करणे हा वैज्ञानिक निष्कर्ष नसून श्रद्धेचा विषय ठरू शकतो.

विज्ञानाची खरी ताकद त्याच्या पुराव्यावर, प्रयोगावर आणि पडताळणीवर आधारित पद्धतीत आहे. त्यामुळे भारतीय परंपरेचा सन्मान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्यात संघर्ष असण्याचे कारण नाही. 'भारतीय ज्ञान' म्हणजे केवळ एका धर्माची किंवा परंपरेची मक्तेदारी नव्हे. बौद्ध, जैन, चार्वाक, भक्ती, सूफी, आदिवासी आणि विविध प्रादेशिक लोकपरंपरांनीही भारताच्या ज्ञानविश्वाला समृद्ध केले आहे.

अभ्यासक्रमात या सर्व प्रवाहांना योग्य स्थान मिळणे आवश्यक आहे. विशेषतः राज्यशास्त्र शिकवताना विद्यार्थ्यांना कोणत्याही एका विचारधारेचे अनुयायी बनवणे हा उद्देश नसावा. लोकशाही, राज्यघटना, स्वातंत्र्य, समानता, न्याय, धर्मनिरपेक्षता, संघराज्यवाद आणि मूलभूत अधिकार यांचा चिकित्सक अभ्यास झाला पाहिजे.

विद्यार्थ्यांनी सत्ताधाऱ्यांनाही प्रश्न विचारावेत आणि विरोधकांनाही. अभ्यासक्रम बदलणे आवश्यक असते; मात्र त्यामागील निकष, तज्ज्ञांची भूमिका आणि प्रक्रिया पारदर्शक असणे तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षण हे कोणत्याही सरकारचे वैचारिक साधन न बनता स्वतंत्र विचारांची पायाभरणी करणारे माध्यम राहिले पाहिजे.

भारतीय ज्ञानाचा अभिमान असावा; पण त्या अभिमानाला तर्क, पुरावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड असणे हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे.

## प्रासंगिक »

### खरा विजय

**एका गावात अमोल आणि निखिल हे दोन मित्र राहत होते. अमोल नेहमी अभ्यासात मेहनत घेत असे, तर निखिलला शॉर्टकटची सवय होती. परीक्षेच्या आदल्या दिवशी निखिलने अमोलला उत्तरं दाखवण्याची विनंती केली.**

अमोलने स्पष्ट नकार दिला. परीक्षेत निखिलने कॉपी करण्याचा प्रयत्न केला; पण शिक्षकांच्या लक्षात आले आणि त्याची उत्तरपत्रिका रद्द झाली. अमोलने मात्र स्वतःच्या मेहनतीवर परीक्षा दिली आणि चांगले गुण मिळवले.

निखिलला आपल्या चुकीची जाणीव झाली. त्याने अमोलची माफी मागून पुढच्या परीक्षेसाठी मन लावून अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. काही महिन्यांनी झालेल्या परीक्षेत निखिलनेही चांगले गुण मिळवले.

त्यावेळी तो अमोलला म्हणाला, “शॉर्टकटने मिळणारे यश क्षणिक असते; पण मेहनतीने मिळवलेले यश कायम समाधान देते.”

- तात्पर्य : प्रामाणिकपणा आणि मेहनत यांना पर्याय नसतो. दुसऱ्याच्या आधारावर मिळवलेले यश कधीही खरे यश नसते.

साखर ही प्रत्येक भारतीयाच्या स्वयंपाकघरातील अत्यावश्यक वस्तू. चहा, नाश्ता, मिठाईपासून सणासुदीच्या पदार्थांपर्यंत तिचा वापर होतो.

# साखरेचा गोडवा महागाईने हिरावला



त्यामुळे साखरेच्या दरात अचानक झालेली वाढ ही केवळ एका वस्तूची महागाई नसून सर्वसामान्यांच्या घरखर्चावर परिणाम करणारी बाब आहे. श्रावणापासून सुरू झालेल्या सणासुदीच्या काळातच साखरेचे दर वाढल्याने नागरिकांच्या आर्थिक चिंतेत भर पडली आहे.

साखरेच्या दरवाढीमागे उत्पादनातील संभाव्य घट, हवामानातील बदल, मागणी-पुरवठ्यातील असमतोल आणि बाजारातील साठेबाजी अशी अनेक कारणे असू शकतात. मात्र नेमके कारण कोणतेही असो, त्याचा सर्वाधिक फटका ग्राहकांनाच बसतो. उत्पादन कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन व्यापाऱ्यांकडून साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असेल, तर त्यावर सरकारने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. इथेनॉल निर्मितीमुळे साखरेचे उत्पादन कमी होत असल्याची चर्चाही होत आहे. सरकारने या आरोपांबाबत स्पष्टीकरण दिले असले, तरी साखर उद्योगातील उत्पादन, साठा, निर्यात आणि इथेनॉलकडे वळवला जाणारा ऊस यांचा संपूर्ण हिशेब पारदर्शकपणे जनतेसमोर येणे गरजेचे आहे. बाजारातील अफवांपेक्षा वस्तुस्थिती स्पष्ट झाली तर ग्राहकांमधील भीती कमी होऊ शकते.

महागाईचे संकट केवळ साखरेपुरते मर्यादित नाही. भाज्या, फळे, डाळी आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दरही वाढले आहेत. साखरेच्या दरवाढीचा अप्रत्यक्ष परिणाम चहा, मिठाई, बेकरी पदार्थ, शीतपेये, आइस्क्रीम आणि अन्य खाद्यपदार्थांवर होतो. त्यामुळे एका वस्तूची किंमत वाढली की त्यातून अनेक वस्तू महाग होण्याची साखळी तयार होते. सणासुदीच्या काळात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. घराघरांत धार्मिक कार्यक्रम, पाहुणचार आणि पारंपरिक पदार्थांची तयारी सुरू असते. अशा वेळी जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढणे म्हणजे कुटुंबांच्या अर्थसंकल्पावर अतिरिक्त ताण.

सरकारने केवळ तात्पुरत्या उपायांवर समाधान न मानता बाजारातील साठेबाजीवर लक्ष ठेवण्याबरोबरच पुरवठा सुरळीत ठेवण्याची दीर्घकालीन व्यवस्था करावी. घरगुती वापरासाठी आणि मोठ्या औद्योगिक वापरासाठी साखरेचे दर वेगळे ठेवण्याचा पर्यायही गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजेची वस्तू महाग होऊ नये, ही सरकारची जबाबदारी आहे. शेतकऱ्याला योग्य दर मिळावा आणि ग्राहकाला परवडणाऱ्या किमतीत साखर मिळावी, यामध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. साखरेची चव गोड असली, तरी तिच्या वाढत्या किमतीने ती सर्वसामान्यांसाठी कडू होत आहे. सणांचा आनंद महागाईच्या चिंतेने फिका होऊ नये, एवढीच अपेक्षा.

## ।। अभंगवाणी ।।



एकादशीव्रत सोमवार न करिती ।
कोण त्यांची गति होइल नेणों ॥१॥

काय करूं बहु वाटे तळमळ ।
आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठी शिकण्यास रिक्षाचालकांना मुदतवाढ!

## मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदत; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

महाईन्यूज । मुंबई

**मुंबईसह राज्यभरातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना देवेंद्र फडणवीस सरकारने मोठा दिलासा दिला आहे. या सगळ्यांना जुजबी मराठी शिकण्याठी सरकारने एक वर्षाची मुदत दिली आहे. या वर्षभरात कुठलीही कारवाई केली जाणार नाही असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. मराठी शिकण्यासाठी आम्हाला वेळ वाढवून द्या अशी मागणी करत रिक्षा आणि टॅक्सी चालक संघटनांचे प्रतिनिधी देवेंद्र फडणवीस यांना भेटले होते. त्यांच्या भेटीनंतर जी चर्चा झाली त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना हा निर्णय जाहीर केला.**



अमराठी टॅक्सी आणि रिक्षा चालक आहेत त्यांची संघटना आम्हाला भेटली त्यांच्या प्रतिनिधींनी हे सांगितलं की आम्हाला वेळ वाढवून द्या. आम्हाला इतक्या तातडीने मराठी भाषा शिकणं शक्य नाही. त्यामुळे आम्ही असा निर्णय घेतला आहे की मराठी शिकण्यासाठी या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल. एक वर्षभर या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई केली जाणार नाही. या एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी हा निर्णय घेतला आहे की वेगवेगळ्या प्रकारे क्लासेस तयार करुन जुजबी मराठी शिकतील. त्यांना वेळ वाढवून हवा होता. त्यामुळे या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो निर्णय घेतला त्याबद्दल मला आनंद आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हे सांगितलं होतं की मराठी ही प्रेमाची भाषा आहे, ती प्रेमाने शिकली पाहिजे त्याची सक्ती करता कामा नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी घोषणा केली आहे ती चांगलीच आहे. मी फक्त एक आठवण करुन देऊ इच्छितो की १२ ऑगस्टचा जो जीआर आहे त्यात मराठी भाषा शिकण्यासाठी अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. त्या मुदतीत मराठी न शिकल्यास बॅज आणि परवाना जप्त केला जाईल आणि पुन्हा तीन महिन्यांची मुदत दिली जाईल असं म्हटलं आहे तो जीआर रद्द करावा किंवा सुधारणा करावी ही विनंती करतो आहे असं संजय निरुपम यांनी म्हटलं आहे.

### रिक्षा-टॅक्सी चालकांच्या प्रतिनिधींची प्रतिक्रिया काय?

आज मुंबईसह राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना महाराष्ट्राचे दिलदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक वर्षभराची मुदत दिली आहे. मराठी शिकण्यासाठी ही मुदत देण्यात आली आहे. काही महिन्यांपासून थोडासा दबाव रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर होता. आम्ही सगळी परिस्थिती सांगितली. मराठी बोला आणि महाराष्ट्र जोडा हा कार्यक्रम सुरु करतो असं आम्ही आज मुख्यमंत्र्यांना सांगितलं. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मुदत द्या अशी विनंती केली होती. त्यानंतर आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुदत दिली आहे. आम्ही त्यांचे आभार मानतो असं रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या संघटनेच्या प्रतिनिधींनी म्हटलं आहे.

## पंचतारांकित वा रस्त्यावरील खाद्यविक्रेत्यांनी नियमभंग केल्यास कारवाई अटळ

महाईन्यूज । मुंबई

**पंचतारांकित हॉटेल किंवा रस्त्यावरील विक्रेता असो वा गणेशोत्सवातील महाप्रसाद असो, कोणीही अन्न सुरक्षेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई अटळ आहे, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. सणासुदीच्या काळात काही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच, प्रत्येक सणाच्या आधी, सणादरम्यान व सणानंतर नियामकांनी कोणती पावले उचलावीत, याचे नियोजन केले आहे. यासंदर्भातील नियमावली गुरुवारी जारी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सणासुदीच्या काळात भेसळयुक्त मिठाई, अस्वच्छ खाद्यपदार्थ व नियमबाह्य अन्नविक्रीवर एफडीएची विशेष नजर राहणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.**



अन्न सुरक्षा, मिठाई, शालेय पोषण आहार, औषधे, रक्तपेढ्या तसेच सणासुदीतील तपासणी मोहिमेबाबत मुंबई प्रेस क्लबमध्ये आयोजित वार्तालाप कार्यक्रमात मुंढे यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. दरवर्षी सणासुदीच्या काळात कारवाईसंदर्भात आदेश काढले जातात. मात्र, हे आदेश प्रत्येक सणानुसार स्वतंत्र व व्यापक स्वरूपाचे नसतात. सणासुदीच्या काळात काही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी नियोजन करण्यात आले आहे. सणासुदीच्या काळामध्ये कारवाई करण्यासाठी सण आणि उत्सव लक्षात घेऊन १२ महिन्यांचे एक कॅलेंडर तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये ख्रिसमस, दिवाळी, ईद अशा सर्व सणांचा समावेश आहे.

या सणादरम्यान नियामकांनी कोणत्या तारखेपासून कोणत्या प्रकारच्या उपाययोजना कराव्यात, याची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. सणापूर्वी, सणाच्या काळात आणि सणानंतर अशा चार टप्प्यांमध्ये ही प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. ही व्यवस्था लवकरच लागू करण्यात येणार असून, गुरूवारी त्यासंदर्भातील नियमावली जाहीर करण्यात येणार असल्याचे तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे गणेशोत्सव, नवरात्रौत्सवामध्ये महाप्रसाद किंवा भंडाऱ्याचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जाते. यावेळी महाप्रसाद किंवा जेवण बनविणाऱ्या व्यक्तीसाठी अन्न सुरक्षा नियम लागू होतात. त्याच्याकडे नोंदणी आणि परवाना असणे आवश्यक आहे. निर्धारित मानके आणि नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. परवान्याशिवाय किंवा निर्धारित मानकांचे पालन न करता अन्नपदार्थ तयार करून त्याचे वाटप करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येईल. उत्सव असो किंवा नसो, प्रत्येक अन्न व्यवसाय चालकाने परवाना घेतलेला किंवा नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

निर्धारित प्रक्रिया आणि नियमांनुसारच अन्न तयार केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. सणासुदीच्या काळातही जास्त चरबीयुक्त, जास्त साखरयुक्त आणि जास्त मीठ असलेले एचएफएसएस पदार्थ टाळावेत. ते खायचे असल्यास मर्यादित प्रमाणात खावेत. त्याऐवजी पौष्टिक आणि संतुलित आहार घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

### ३१०० अन्न व्यवसाय चालकांची तपासणी

३१ जुलैपर्यंत अन्न क्षेत्रातील ३१०० पेक्षा अधिक अन्न व्यवसाय चालकांची तर औषध क्षेत्रातीलही सुमारे १०० तपासण्या करण्यात आल्या. तपासणीदरम्यान १६५ परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आणि ७५० पेक्षा अधिक आस्थापनांना सुधारणा नोटिसा देण्यात आल्या. उर्वरित आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गंभीर त्रुटी आढळल्या नाहीत. या १६५ निलंबनांपैकी सुमारे १०० जणांनी अपील केले. त्यातील ७० जणांना दिलासा देण्यात आला आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये अंतिम आदेश जारी करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मुंढे यांनी सांगितले.

# मोजतबा खामेनी जिवंत, पण गंभीर जखमी

## इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या प्रकृतीबाबत डोनाल्ड ट्रम्पांचा मोठा दावा

**महाईन्यूज । अमेरिका**

**इराणचे सर्वोच्च नेते मोजताबा खामेनी यांच्या तब्येतीबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. खामेनी अद्याप जिवंत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर मोजताबा यांची सर्वोच्च नेतेपदी निवड झाली. पण, या निवडीनंतरही मोजताबा सार्वजनिक ठिकाणी अथवा वडिलांच्या अंत्यसंस्काराच्यावेळीही दिसून आले नाहीत. यावरुन त्यांच्या तब्येतीबाबत विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले. यानंतर आता ट्रम्प यांनी मोजताबा जिंवत असतील पण, गंभीर जखमी असल्याचे वक्तव्य केले आहे.**





ग्लेन बेक या रेडिओ होस्टला दिलेल्या टेलिफोनिक मुलाखतीत डोनाल्ड ट्रम्प मोजताबा खामेनी यांच्या तब्येतीबाबत वक्तव्य केले आहे. "मला नाही वाटत त्यांचा मृत्यू झाला असेल. ते गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या शरीराची डावी बाजू, हात, पाय सर्वच ठिकाणी, पण मला नाही वाटत त्यांचा मृत्यू झालाय", असे डोनाल्ड ट्रम्प मुलाखतीत म्हणाले. "आणि खामेनी खरोखरच जिवंत नसतील, तर इराण उत्तम नाटक करतंय", असेही राष्ट्राध्यक्ष ट्रम्प पुढे म्हणाले.

अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर संयुक्त हल्ला केला. हल्ल्याच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. खामेनी यांच्यासह त्यांच्या घरातील इतरांचा देखील यात मृत्यू झाला. दरम्यान, यावेळी मोजताबा खामेनी देखील गंभीर जखमी झाल्याचा दावा केला जातो. मोजताबा खामेनी यांची वडिलांच्या मृत्यूनंतर सर्वोच्च नेतेपदी निवड करण्यात आली मात्र, त्यांनी अद्याप सार्वजनिक ठिकाणी उपस्थिती दर्शवली नाही. यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत उलट सुलट चर्चा सुरु होती.

काही दिवसांपूर्वी इराणी फार्स वृत्तसंस्थेने मोजताबा खामेनी यांचा एक व्हिडीओ प्रसिद्ध केला होता. या व्हिडीओची सत्यता समोर आली नाही मात्र मोजताबा या व्हिडीओत संवाद साधताना दिसत होते. मोजताबा खामेनी वडिलांच्या अंत्यसंस्कारावेळी देखील अनुपस्थित असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा देखील दावा केला जात होता. दरम्यान, विविध आंतरराष्ट्रीय माध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या वृत्तांनुसार मोजताबा यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जाते तसेच, त्यांच्यावर उपचार सुरु असून, त्यांच्या ठिकाणाबाबतही नेमकी माहिती नसल्याचे सांगितले जाते.

# हरियाणवी गायक अंकित बालियानची गोळ्या झाडून निर्घृण हत्या

**महाईन्यूज । उत्तर प्रदेश**

**हरियाणवी गायक आणि यूट्यूबर अंकित बालियान याची उत्तर प्रदेशातील शामली जिल्ह्यात बुधवारी संध्याकाळी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. जिममधून बाहेर पडत असताना दोन दुचाकींवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अनेक गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात बालियानचा जागीच मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही घटना कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. बालियान नेहमीप्रमाणे जिममध्ये व्यायाम केल्यानंतर बाहेर पडत होता. त्याचवेळी हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला आणि घटनास्थळावरून दुचाकींवरून पसार झाले.**



### यूट्यूबवर साडेतीन लाखांहून अधिक फॉलोअर्स

बालियानच्या यूट्यूब चॅनेलवर साडेतीन लाखांहून अधिक सदस्य होते. हरियाणवी गाणी आणि परफॉर्मन्समुळे त्याने मोठा चाहतावर्ग निर्माण केला होता. त्याच्या अनेक व्हिडिओंमध्ये बंदुका, शस्त्रे आणि एसयूव्ही गाड्यांचे चित्रण पाहायला मिळत असे. तो शामलीतील बंटिखेडा गावचा रहिवासी होता. २०२३ मध्ये परवानगीशिवाय रोड शो केल्याच्या आरोपावरून त्याच्याविरोधात शामलीमध्ये एफआयआर ही दाखल करण्यात आली होती.

जिमचे मालक रवी शर्मा यांनी एएनआयला सांगितले की, बालियान दररोज जिममध्ये येत होता. बुधवारी संध्याकाळी सुमारे साडेसहा ते पावणेसात वाजता तो व्यायाम करून बाहेर पडत असताना काही जणांनी त्याच्यावर गोळीबार केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोरांनी अंदाजे १५ ते २० वेळा गोळीबार केला. बालियानला रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

शामलीचे पोलिस अधीक्षक एनपी सिंह यांनी सांगितले की, हत्येमागील कारण शोधण्यासाठी आणि आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांची अनेक पथके तयार करण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे कामही सुरू आहे.

बालियानच्या हत्येची बातमी पसरताच त्याचे कुटुंबीय आणि समर्थक रस्त्यावर उतरले. त्यांनी घटनास्थळापासून सुमारे ५० मीटर अंतरावर असलेल्या वर्मा मार्केट तिराहाजवळ दिल्ली-मुझफ्फरनगर रस्ता रोखून धरला. हल्लेखोरांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी बालियानच्या हत्येचा निषेध केला. तसेच राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची स्थिती 'शून्यावर' आली असल्याचे म्हटले आणि यामागे काही राजकीय वैर असू शकते का, याची चौकशी करण्याची मागणी केली. बालियानच्या हत्येनंतर जाट समाजातही संताप असून हल्लेखोरांच्या अटकेची मागणी होत असल्याचे यादव यांनी म्हटले.

बालियान आगामी पंचायत निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा होती. मात्र त्याने निवडणूक लढवण्याची अधिकृत घोषणा केली होती किंवा त्याच्या हत्येचा निवडणुकीशी संबंध आहे, याची पुष्टी अद्याप पोलिसांकडून दिली गेली नाही.


# पूरग्रस्त नेपाळसाठी सोनू सूद सरसावला!

नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात अचानक आलेल्या महापुराने मोठा विंध्वस झाला आहे. महापुराच्या रौद्ररुपाने खळबळ उडाली



असून सोशल मीडियावर या महापुराचे धक्कादायक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. नेपाळमध्ये आलेल्या या विनाशकारी पुरामुळे आतापर्यंत सुमारे १६० जणांचा मृत्यू झाला असून ७५० हून अधिक लोक बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. नेपाळ लष्करातर्फे युद्धपातळीवर मदतकार्य सुरू केले आहे. १५ हेलिकॉप्टर्सच्या मदतीने आत्तापर्यंत २५० हून अधिक लोकांना बाहेर काढण्यात यश आले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी नेपाळकडून सर्वेत्तोपरी प्रयत्न केले जात आहेत. या कठीण काळात बॉलिवूड अभिनेता सोनू सूदने नेपाळच्या लोकांना मदतीचा हात पुढे केला आहे.

अभिनेता सोनू सुदने आपल्या सोशल मीडिया हँडलवर एक पोस्ट शेअर करून पूरग्रस्तांना प्रोत्साहन दिले आहे. "नेपाळ, या कठीण काळात तुम्ही एकटे नाही आहात. आम्ही अन्न, निवारा आणि तुम्हाला पुन्हा उभारणीसाठी मदत करण्याच्या आशेसह लवकरच तुमच्यापर्यंत पोहोचत आहोत." असे पोस्टमध्ये त्याने म्हटले आहे. प्रसिद्ध अभिनेत्री मनीषा कोईराला हिनेही सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली असून, या पोस्टमध्ये तिने लोकांना या पूरस्थितीत नेपाळसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे.





# कंगना रणौतचा पलटवार!

भाजप खासदार कंगना रणौत आणि बाबा रामदेव यांच्यातील शाब्दिक युद्ध थांबवण्याचे नाव घेत नाहीये. जेन झींचे आंदोलन संपल्यानंतर दोघांमध्ये शाब्दिक युद्ध सुरू झाले. ते अजूनही सुरूच आहे. योगगुरू बाबा रामदेव यांनी कंगनाच्या भूतकाळ आणि तारुण्याबाबत केलेल्या टीकेवर आता कंगनाने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत कंगनाने रामदेव यांच्या वक्तव्यावर सवाल उपस्थित करत त्यांच्या योग आणि आयुर्वेदापासून व्यवसायाकडे वळण्याच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "आयुर्वेद, औषधी वनस्पती आणि योगाला प्रोत्साहन मिळाल्यानंतर आता त्यांनी बनियन आणि अंतर्वस्त्रांच्या व्यवसायातही प्रवेश केला आहे. व्यावसायिक असण्यात काहीच गैर नाही, पण तुम्ही जे नाही, ते असल्याचे नाटक करू नका." अशा शब्दांत कंगनाने बाबा रामदेव यांच्या टीकेचा समाचार घेतला. मुलाखतीत कंगनाला विचारण्यात आले की, सनातन विचारधारेचे अनुयायी असलेले बाबा रामदेव तिचे विरोधक कसे बनले? या प्रश्नावर उत्तर देताना कंगनाने बाबा रामदेव यांच्यावर निशाणा साधला. व्यावसायिक हितसंबंधांमुळे ते सनातन तत्त्वज्ञानाच्या मूलभूत विचारांपासून दूर गेल्याचे मत तिने व्यक्त केले. कंगना म्हणाली, "जेव्हा माझी स्वदेशी चळवळ सुरू झाली, तेव्हा सरकारनेही मला मोठे प्रोत्साहन दिले होते. मात्र, मला वाटते की ते भांडवलशाहीच्या दिशेने खूप पुढे गेले आहेत."



# बिग बॉस 20 मध्ये शिवांगी जोशी?

अभिनेता सलमान खान होस्ट करत असलेला 'बिग बॉस २०' या शोची चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे. हा शो लवकरच प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी येत असून, या शोसाठी अनेक स्पर्धकांची नावेही समोर येत आहेत. यामध्ये टीव्ही अभिनेत्री शिवांगी जोशी हिच्या नावाचीही चर्चा होत आहे. मात्र याबाबत स्वत: शिवांगीने पोस्ट शेअर करत खुलासा केला आहे. शिवांगी जोशीने 'बिग बॉस २०' मध्ये सहभागी होण्याच्या बातम्यांवर प्रतिक्रिया देत त्या पूर्णपणे चुकीच्या असल्याचे सांगितले आहे. तिने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत लिहिले, "मला समजले आहे की सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये मी 'बिग बॉस'मध्ये सहभागी होत असल्याचा चुकीचा दावा केला जात आहे. मला स्पष्ट करायचे आहे की मी 'बिग बॉस २०' मध्ये भाग घेत नाहीये आणि तो व्हिडिओ पूर्णपणे बनावट आहे." नुकताच सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये शिवांगी जोशी 'बिग बॉस २०'ची कन्फर्म स्पर्धक असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, आता अभिनेत्रीने या सर्व अफवा फेटाळून लावल्या आहेत. तिने सविस्तर पोस्ट शेअर करत चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# सोनल दिनुशाचा ऐतिहासिक पराक्रम

## कसोटी क्रिकेटमध्ये सोनल दिनुशा नावाचे वादळ; भारताविरुद्ध ४ डावांत ३८७ धावा

**महाईन्यूज । कोलंबो**

**श्रीलंकेचा युवा फलंदाज सोनल दिनुशा याने कोलंबो कसोटीत आपल्या फलंदाजीच्या जोरावर नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात सलग दुसरे शतक झळकावून त्याने क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले. कसोटीच्या अखेरच्या दिवशी चहापानापर्यंत दिनुशा ९८ धावांवर नाबाद खेळत होता. त्यानंतर तिसऱ्या सत्रात मैदानात उतरताच अवघ्या २ धावांची भर घालत त्याने १९६ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले. यासह त्याने दोन सामन्यांच्या या कसोटी मालिकेत तिसऱ्या शतकाची नोंद केली आहे.**



मालिकेतील गॉल येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीतही सोनलने शानदार शतक झळकावले होते. आता दुसऱ्या कसोटीतही सलग शतकी खेळी साकारत त्याने कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एका सुवर्ण अध्यायाची नोंद केली आहे. कोलंबो कसोटीच्या दुसऱ्या डावात शतक झळकावताच, भारताविरुद्धच्या आपल्या कारकिर्दीतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये तब्बल तीन शतके ठोकणारा तो जगातील पहिलाच फलंदाज ठरला आहे. यापूर्वी कसोटी क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही फलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नव्हती.

गॉल कसोटीच्या पहिल्या डावात १०० आणि दुसऱ्या डावात ८४ धावांची खेळी करणाऱ्या सोनलने कोलंबो कसोटीतही आपली अप्रतिम लय कायम राखली. कोलंबो कसोटीच्या पहिल्या डावात त्याने २२३ चेंडूंत १०३ धावांची खेळी साकारली होती आणि त्यानंतर दुसऱ्या डावात नाबाद शतकी खेळी करत नवा विक्रम आपल्या नावे केला. या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत दिनुशा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला असून, त्याने ४ डावांमध्ये तब्बल ३८७ धावा कुटल्या आहेत.

याच सामन्यादरम्यान अर्धशतक गाठताच सोनलच्या नावावर आणखी एका ऐतिहासिक विक्रमाची नोंद झाली. भारताविरुद्धच्या कारकिर्दीतील पहिल्या चारही कसोटी डावांमध्ये ५० पेक्षा अधिक धावा करणारा तो जगातील पाचवा फलंदाज ठरला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये तब्बल ६७ वर्षांनंतर अशा विक्रमाची पुनरावृत्ती झाली आहे. यापूर्वी १९५९ मध्ये इंग्लंडच्या केन बॅरिंग्टन यांनी भारताविरुद्ध आपल्या पहिल्या चार डावांत पन्नासहून अधिक धावा करण्याचा पराक्रम केला होता. त्याआधी इंग्लंडचे डग्लस जार्डिन (१९३२ ते १९३४), वेस्ट इंडिजचे एव्हर्टन वीक्स (१९४८) आणि क्लाइव्ह वॉलकॉट (१९४८) यांनी अशी कामगिरी नोंदवली होती; आता २०२६ मध्ये सोनल दिनुशा या दिग्गज फलंदाजांच्या पंक्तीत जाऊन बसला.

### २९ वर्षांनंतर श्रीलंकेकडून असा पराक्रम

सोनल दिनुशा भारताविरुद्धच्या एकाच कसोटी सामन्याच्या दोन्ही डावांत शतके झळकावणारा श्रीलंकेचा तिसरा फलंदाज ठरला आहे. तब्बल २९ वर्षांनंतर श्रीलंकेच्या फलंदाजाकडून असा पराक्रम पाहायला मिळाला आहे. याआधी १९८२ मध्ये चेन्नई कसोटीत दुलिप मेंडिस यांनी (१०५ व १०५) आणि १९९७ मध्ये कोलंबोच्या मैदानावर अरविंद डी सिल्वा यांनी (१४६ व १२०) अशी दुहेरी शतकी कामगिरी केली होती. आता कोलंबोच्या याच मैदानावर पहिल्या डावात १०३ आणि दुसऱ्या डावात नाबाद १०० धावांची खेळी करत सोनलने हा अनोखा बहुमान संपादन केला आहे.

# भारत – अफगाणिस्तान दिल्लीत भिडणार! पण फायदा पाकिस्तानचा होणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका झाल्यानंतर, भारतीय संघ घरच्या मैदानावर अफगाणिस्तानचा सामना करणार आहे. पण अफगाणिस्तानचा संघ यजमान असून भारतीय संघाचा पाहुणचार करणार आहे. दोन्ही संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील तिन्ही सामने दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत.**




भारतात होणाऱ्या या टी-२० मालिकेचे ब्रॉडकास्टिंग राईट्स अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तानच्या ट्रांसग्रुप कंपनीला विकले आहेत. या कंपनीचा संबंध पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेशी देखील आहे. अफगाणिस्तानचा संघ भारतात भारतीय संघाचा पाहुणचार करणार, अशी घोषणा अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने १२ ऑगस्टला केली होती. त्यावेळी क्रिकेट बोर्डाने ब्रॉडकास्टिंग राईट्सचा देखील उल्लेख केला होता. त्यावेळी पाकिस्तानचा देखील उल्लेख करण्यात आला होता.

ट्रांसग्रुप कंपनीचं हेड क्वार्टर लाहोरमध्ये आहे. इथूनच या मालिकेचं प्रसारण जगभरात केलं जाईल. या मालिकेचं लाईव्ह ब्रॉडकास्टिंग करण्यासाठी ट्रांसग्रुप कंपनीने अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठी रक्कम दिली असावी. पण भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये थरारक सामने पाहायला मिळू शकतात. त्यामुळे ट्रांसग्रुप कंपनीला चांगलाच फायदा होणार आहे. भारतात ही मालिका तुम्ही फॅनकोडवर लाईव्ह पाहू शकतात. पण जर तुम्हाला टीव्हीवर ही मालिका लाईव्ह पाहायची असेल, तर तुम्ही सोनी स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहू शकता.

आतापर्यंत झालेल्या भारत आणि अफगाणिस्तान टी-२० सामन्यांमध्ये थरारक सामने पाहायला मिळाले आहेत. येत्या काही दिवसात भारतीय संघ एशियन गेम्स स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या स्पर्धेत भारत- अफगाणिस्तान सामना पाहायला मिळू शकतो. त्याआधी ही मालिका दोन्ही संघांसाठी सराव मालिका असणार आहे. मालिकेतील पहिला सामना १३ सप्टेंबरला, दुसरा सामना १५ सप्टेंबरला आणि तिसरा सामना १७ सप्टेंबरला खेळवा जाणार आहे. पण या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने केली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 28 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


# ADMISSION OPEN

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

Employability Enhancement Foundational Course In

**AI and Statistical Analysis, Python and Excel Analytics.**



**Eligibility : Second year passed, B.Sc (Comp/ Stat/ Maths) / /BCA/ BCS, /B. E / B.Tech, any Diploma or Equivalent**

- 10000+ STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES
- 25 YEARS OF EXPERIENCE IN EDUCATION
- 100% PLACEMENT ASSISTANCE

Scan the QR code!

Register Now https://www.icit.org.in

VLSI DESIGN & RESEARCH CENTRE

VLSI | Savitribai Phule Pune University | iCiT

Integrated Circuit and Information Technology Pvt. Ltd.,

Department of Electronics and Instrumentation Science,
Savitribai Phule Pune University, Pune 411007
Contact : 8669668900/100, 9922219219
Email : info@icit.org.in /

# किवळे-रावेत-मामुर्डीतील २५ सोसायट्यांचा आंदोलनाचा इशारा

## रस्ते, वाहतूक कोंडी, अंडरपास आणि वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर नागरिक आक्रमक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**किवळे, रावेत आणि मामुर्डी परिसरातील प्रलंबित नागरी समस्यांबाबत आता नागरिक आक्रमक झाले असून, परिसरातील तब्बल *२५ गृहनिर्माण सोसायट्यांनी मोठ्या आंदोलनाचा इशारा* दिला आहे. या आंदोलनात *१,००० हून अधिक नागरिक सहभागी होण्याची शक्यता* असून, रस्ते, वाहतूक कोंडी, अंडरपासची दुरवस्था आणि वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. परिसरातील विविध सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि नागरिक एकत्र येत असून, मागण्यांवर वेळेत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.**



रावेत आणि किवळेच्या सीमेवरील *१८ मीटर रुंदीचा डीपी रोड तातडीने विकसित करून वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा*, ही नागरिकांची प्रमुख मागणी आहे. या रस्त्याच्या विकासामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र, रस्ता अद्याप पूर्ण क्षमतेने विकसित न झाल्याने नागरिकांना पर्यायी मार्गांवरून प्रवास करावा लागत असल्याची तक्रार आहे.

परिसरातील सुमारे *१५ ते २० गृहनिर्माण सोसायट्यांसमोरील रस्ते अत्यंत खराब अवस्थेत* असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. खड्डे, उखडलेले रस्ते आणि अपुऱ्या देखभालीमुळे वाहनचालकांसह ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक ठिकाणी डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मुकाई चौकातील वाढती वाहतूक कोंडी आणि खराब रस्ते ही देखील प्रमुख समस्या बनली आहे. गर्दीच्या वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, रोजच्या प्रवासासाठी नागरिकांचा मोठा वेळ वाया जात आहे. या चौकातील वाहतूक व्यवस्थेसाठी स्वतंत्र आणि प्रभावी नियोजन करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. समीर लॉन्स अंडरपासची दयनीय अवस्था** तातडीने सुधारावी, तसेच या ठिकाणी वारंवार होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. त्याचप्रमाणे मामुर्डी अंडरपासची खराब अवस्था सुधारून नागरिकांसाठी सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे.

ITrend आणि तत्सम गृहनिर्माण सोसायट्यांमधील वीजपुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. वारंवार होणाऱ्या वीजपुरवठ्यातील अडचणींमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. नियमित आणि सुरळीत वीजपुरवठ्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व प्रश्नांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन *वेळबद्ध आणि ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी परिसरातील सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनी केली आहे. मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास २५ सोसायट्यांमधील हजाराहून अधिक नागरिकांच्या सहभागाने मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे किवळे, रावेत आणि मामुर्डी परिसरातील प्रलंबित नागरी प्रश्नांवर आता PCMC प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### गृहप्रकल्प वाढले; पायाभूत सुविधा मात्र अपुऱ्या

किवळे, रावेत आणि मामुर्डी परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर निवासी गृहप्रकल्प विकसित झाले आहेत. परिणामी या भागातील लोकसंख्येतही मोठी वाढ झाली आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत रस्ते, वाहतूक व्यवस्था, अंडरपास आणि इतर मूलभूत पायाभूत सुविधांचा अपेक्षित वेगाने विकास झालेला नसल्याची नागरिकांची नाराजी आहे. परिणामी, हजारो रहिवाशांना दररोज वाहतूक कोंडी, खराब रस्ते, अंडरपासची दुरवस्था आणि वीज समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

# मॉडेल कॉलेजमध्ये सायबर क्राईम जनजागृती सत्र; विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे धडे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डिजिटल व्यवहार, सोशल मीडिया आणि ऑनलाइन माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने खांबालपाडा येथील मॉडेल कॉलेजमध्ये सायबर क्राईम जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. १० ऑगस्ट २०२६ रोजी माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात ऑनलाइन फसवणूक, सायबर गुन्हे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.**



प्रगती कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, डोंबिवली पश्चिम येथील *टी. वाय. बी.एस्सी. आयटीच्या विद्यार्थिनी खुशी पाल आणि संध्या सहानी* यांनी हे सत्र घेतले. *"सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा"* या उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना डिजिटल जगतातील वाढत्या धोक्यांविषयी माहिती देण्यात आली.

आजच्या काळात मोबाईल फोनचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून, GPay आणि FamPay सारख्या डिजिटल पेमेंट ॲप्सद्वारे आर्थिक व्यवहार, तसेच Instagram, YouTube, ऑनलाइन गेमिंग आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्मवरील वाढता वेळ यामुळे सायबर सुरक्षेचे महत्त्व अधिक वाढले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयींची माहिती देण्यासाठी हे जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले होते.

सत्रादरम्यान सायबर क्राईम म्हणजे काय, सायबर गुन्हे कशा पद्धतीने घडतात आणि ऑनलाइन धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी फेक लिंक, फोटो मॉर्फिंग, व्हिडिओ कॉल स्कॅम, ओटीपी फसवणूक, व्हायरस तसेच विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकींबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

हे सत्र अत्यंत संवादात्मक आणि माहितीपूर्ण ठरले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपले अनुभव मांडले तसेच सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांनी दाखवलेली उत्सुकता आणि डिजिटल सुरक्षेबाबत अधिक जाणून घेण्याची जिज्ञासा विशेष उल्लेखनीय ठरली.

महाविद्यालयातील अधिकारी आणि प्राध्यापकांचे या उपक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले. शिक्षकांनी सत्राचे कौतुक करत सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. सत्रादरम्यान देण्यात आलेली माहिती दैनंदिन जीवनात आणि डिजिटल माध्यमांचा वापर करताना उपयुक्त ठरणार असल्याचा अभिप्रायही देण्यात आला.

प्रगती कॉलेज आणि Quick Heal Foundation यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयातील अधिकारी, प्राध्यापक आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या मार्गदर्शन व समन्वयामुळे खुशी पाल आणि संध्या सहानी यांना या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली.

सायबर गुन्ह्यांचे वाढते स्वरूप आणि डिजिटल माध्यमांचा व्यापक वापर पाहता अशा जनजागृती उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहार, सोशल मीडिया वापर आणि ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्याबाबत आवश्यक माहिती मिळत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात

## बंधुभाव, मानवता आणि शांततेचा संदेश; विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**बंधुभाव, मानवता आणि शांततेचा संदेश देत जुलूस-ए-मोहम्मदिया कमिटी ट्रस्ट, पिंपरी-चिंचवडच्या वतीने हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलाद उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. शहराच्या विविध भागांतून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लिम बांधवांनी मिरवणुकीचे उत्स्फूर्त स्वागत करून सामाजिक सलोख्याचे दर्शन घडविले.**



पारंपरिक धार्मिक वातावरणाला आधुनिकतेची जोड देत काढण्यात आलेल्या मिरवणुकीत चिमुकल्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिक सहभागी झाले होते. निगडी, ओटा स्कीम, रूपीनगर, आकुर्डी, चिंचवड, कुदळवाडी, चिखली, जाधववाडी, थरकवाडी, पॉवर वस्ती, लांडेवाडी, भोसरी, बालाजीनगर, नेहरूनगर, संत तुकारामनगर, मोरवाडी, वाकड, काळाखडक, थेरगाव, पवनानगर, काळेवाडी, पिंपरी कॅम्प, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी आदी परिसरांतून मिरवणुका काढण्यात आल्या.

सुन्नी उलेमा कौन्सिलच्या धर्मगुरूंसमवेत निघालेल्या या मिरवणुका पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एकत्र आल्या. येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. विविध भागांतून आलेल्या भाविकांनी आकर्षक देखावे सादर केले. मिरवणुकीदरम्यान अनेक ठिकाणी पाणी, सरबत आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.

यावेळी उत्तर प्रदेशातील प्रमुख प्रवचनकार हजरत अल्लामा मौलाना मुफ्ती मुख्तारूल हसन (बगदादी साहेब किबला, शेखुल हदीस, दारुल हक्क) यांचे प्रवचन झाले. त्यांनी हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन करत मानवता, बंधुभाव, शांतता आणि परस्पर सन्मानाची शिकवण समाजाने आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पिंपरी-चिंचवड जुलूस समितीचे अध्यक्ष रमजान अत्तार, उपाध्यक्ष नासीर शेख, सचिव हाजी अकबर मुल्ला, खजिनदार मुश्ताक अहमद शेख यांच्यासह सलीम मेमन, युसूफ रज्जाक कुरेशी, माजी अध्यक्ष युसूफ कुरेशी, झिशान सय्यद, हाजी गुलाम रसूल, शहाजी अत्तार, हबीब शेख, फारूक इनामदार, माजी शिक्षण सभापती फजल शेख, शहाबुद्दीन शेख, हाजी इद्रीस मेमन, अजहर खान, शकरुल्ला पठाण, कमरुद्दीन तांबोळी, गुलामगौस सिद्धिकी, वाहीद कुरेशी, याकूब खान, नजीर वाघू, हजरत पटेल आणि जाकीर शेख यांनी सहभाग घेतला.

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

पिंपरी-चिंचवड शहराच्या सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध मान्यवरांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, माजी महापौर आझम पानसरे, व्ही. एम. कबीर, शकरुल्ला पठाण, झिशान सय्यद, ताजुद्दीन तांबोळी, जुलूस-ए-मोहम्मदिया कमिटी ट्रस्ट, जब्बार शेख, डॉ. जावेद शेख, अहमद हसन खान, हाजी मुस्तफा खान आणि गुलाम अली भालदार यांचा समावेश होता. यावेळी सर्वपक्षीय राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा होणार वृक्षगणना; आता नव्याने सर्वेक्षण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने टेरॅकॉन इकोटेक प्रायव्हेट लिमिटेड या खासगी एजन्सीमार्फत सॅटेलाईटद्वारे शहरातील झाडांची मोजणी केली होती. शहरात तब्बल 32 लाख 16 हजार 799 वृक्ष असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यासाठी महापालिकेने तब्बल 6 कोटी 76 लाख रुपये खर्च केले. ते वृक्ष मोजणीचे काम वादात सापडले होते. आता पुन्हा या प्रकारे शहरातील झाडांची गणना केली जाणार आहे.**



शहरातील वृक्ष गणना करण्यास स्थायी समितीने 27 सप्टेंबर 2017 ला मान्यता दिली होती. ते संपूर्ण काम सात वर्षात पूर्ण झाले नाही. मात्र, ठेकेदार एजन्सीचे बिल अदा करण्यात आली. त्या एजन्सीनुसार शहरात 32 लाख 16 हजार 977 झाडे असल्याचे महापालिकेकडून सांगितले जात आहे. एका झाडासाठी दहा रुपये खर्च करण्यात आला. त्यापूर्वी 2003 -04 मध्ये मानवी पद्धतीने वृक्षगणना करण्यात आली होती. एका झाडाची मोजणी करण्यासाठी दोन रुपये 35 पैसे देण्यात आले होते. एकूण 39 लाख रुपये खर्च आला होता. आता, पुन्हा झाडांची मोजणी केली जाणार आहे. शहरातील झाडांची जीआयएस किंवा जीपीएस आधारित (भौगोलिक सूचना प्रणाली) मॅपिंग करून त्यांची संख्या मोजणीसाठी एजन्सी नेमण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक एजन्सीकडे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. त्यासाठी 9 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मागण्यात आले आहेत. शहरातील वृक्षांची गणना करण्यासाठी पुन्हा कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील झाडांची दर दहा वर्षांनी मोजणी केली जाते. यंदाच्या वर्षी ही मोजणी केली जाणार आहे. त्यासाठी निविदा प्रसिद्ध करून इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागण्यात आले आहेत. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यास शहरातील झाडांची सर्व प्रकाराची माहिती उपलब्ध होणार आहे, असे महापालिकेचे मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांनी सांगितले. मागील आकडेवारीनुसार शहरात एकूण ३२ लाख १६ हजार ७९९ झाडांची नोंद आहे. यामध्ये ई क्षेत्रीय कार्यालयात सर्वाधिक ८ लाख ४३ हजार ८२४, तर अ क्षेत्रीय कार्यालयात ३ लाख ६ हजार ९४ झाडे आहेत. फ, ड, ब आणि क क्षेत्रीय कार्यालयांत अनुक्रमे ७ लाख ४१ हजार २०३, ५ लाख १२ हजार ३६८, ४ लाख ६२ हजार १३७ आणि ३ लाख ५१ हजार १७३ झाडे आहेत.

### मागील काम ठरले वादग्रस्त

टेराकॉन इकोटेक प्रा. लि या ठेकेदाराला उपग्रहाद्वारे वृक्षगणना करण्याचे काम देण्यात आले होते. दोन वर्षात वृक्षगणना पूर्ण करायची आहे. उर्वरित तीन वर्षांमध्ये किती झाडे तोडली, नवीन किती लावली याचे गणना त्यांनी ठेवायचे आहे. झाडांचे टिपलेले छायाचित्र महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार. मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार होते. सॅटेलाईटद्वारे झाडांची उंची, रुंदी, त्यामधील गर, त्याचे ठिकाण, झाडांची स्थिती, नंबरींग, वृक्षारोपणाची व्याप्ती याची सर्व माहिती जमा केली जाणार आहे, असे सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात तसे न झाल्याने विरोधकांनी कामाबाबत अनेक आरोप केले. त्याबाबत उद्यान विभागाने एजन्सीला नोटीस बजावली होती. मात्र, त्याच्यावर कारवाई करण्यात आली नाही.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507